दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सहकारातून समृद्धीचा नवा महामार्ग

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या सहकार क्षेत्राला आणि साखर उद्योगाला आगामी काळात एक नवी दिशा आणि मोठी गती मिळण्याचे संकेत मिळाले आहेत. केंद्रीय सहकार मंत्र्यांनी राज्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या दोन मोठ्या प्रकल्पांची घोषणा केली असून, यामुळे प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळीला मोठे बळ मिळणार आहे.....

---> अग्रलेख - पान 2 वर

माहिती अधिकार कायद्यात मोठे बदल; राज्य शासनाचे नवे नियम

मुंबई : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जदारांसाठी महाराष्ट्र शासनाने काही महत्त्वपूर्ण बदल लागू केले असून हे नवे नियम १२ जून २०२६ पासून राज्यभर लागू झाले आहेत. अर्ज प्रक्रिया, अपील शुल्क तसेच कागदपत्रांच्या प्रती मिळविण्याच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे.नवीन नियमांनुसार माहिती अधिकाराचा पहिला अर्ज दाखल करण्यासाठी आता १० रुपयांऐवजी ३० रुपयांचा कोर्ट फी स्टॅम्प आवश्यक राहणार आहे. याशिवाय अर्जदाराने माहिती मागण्याचे कारण नमूद करणे तसेच नागरिकत्व सिद्ध करणारा पुरावा जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. २२ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

थोडक्यात वार्ता

तामिळनाडूत अमोनिया गॅस गळती; सात कामगारांचा मृत्यू

चेन्नई : तिरुवल्लूर जिल्ह्यातील (तामिळनाडू) पेरियापालयमजवळील कनिगईपायर गावात असलेल्या सेंट पीटर्स अँड पॉल सीफूड्स एक्सपोर्ट्स या समुद्री खाद्यप्रक्रिया उद्योगात अमोनिया वायूची गळती होऊन भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत सात कामगारांचा मृत्यू झाला असून ६७ जणांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी सात जणांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असून त्यांना कृत्रिम श्वसनयंत्रावर ठेवण्यात आले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त केले असून, घटनेच्या चौकशीसाठी एका समितीची स्थापना करण्याचे आदेश दिले आहेत. या दुर्घटनेबाबत प्रशासनाकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार या कारखान्यामध्ये कोळंबीवर प्रक्रिया करण्याचे काम केले जात असे. या दुर्घटनेनंतर कामगारांमध्ये शोकाकूल वातावरण आहे. तसेच तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांनी या घटनेच्या चौकशीसाठी एक तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या समितीला २४ तासांत अंतरिम अहवाल आणि पुढील ३ दिवसांत अंतिम अहवाल सोपवण्याची सूचना देण्यात आली आहे.

जनरल तुषार मेहता यांच्या तीन वर्षांसाठी फेरनियुक्तीसाठी मंजुरी

नवी दिल्ली : केंद्र सरकारने तुषार मेहता यांची भारताचे सॉलिसिटर जनरल म्हणून आणखी तीन वर्षांसाठी पुनर्नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. ही नियुक्ती १ जुलै २०२६ पासून लागू होणार आहे. त्यांची ही तिसरी पुनर्नियुक्ती असून, यापूर्वी त्यांचा कार्यकाळ दोनदा वाढवण्यात आला होता. कार्मिक व प्रशिक्षण विभाग (डीओपीटी) यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने (एसीसी) देशाचे दुसरे सर्वोच्च विधी अधिकारी म्हणून तुषार मेहता यांना पदावर कायम ठेवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. आदेशात नमूद करण्यात आले आहे की, तुषार मेहता यांची भारताचे सॉलिसिटर जनरल म्हणून आणखी तीन वर्षांसाठी पुनर्नियुक्ती करण्यात आली असून ती १ जुलै २०२६ पासून किंवा पुढील आदेशापर्यंत, यापैकी जे आधी लागू होईल, तेव्हापासून प्रभावी राहील. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल म्हणून सेवा दिल्यानंतर ऑक्टोबर २०१८ मध्ये तुषार मेहता यांची सॉलिसिटर जनरलपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर केंद्र सरकारने १ जुलै २०२० पासून प्रभावी होणाऱ्या तीन वर्षांच्या कार्यकाळासाठी तसेच २०२३ मध्ये त्यांची पुन्हा नियुक्ती केली होती.

सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे कार्यकारी संचालक उमेश सांडू यांचे निधन

मुंबई : आयुर्वेद औषध निर्मिती क्षेत्रात गौरवशाली परंपरा लाभलेल्या सुप्रसिद्ध कंपनी सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे कार्यकारी संचालक, ५९ वर्षीय श्री. उमेश सांडू यांचे आज, शुक्रवार दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता चेंबूर येथील त्यांच्या घरी आकस्मिक निधन झाले. उमेश सांडू यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष प्रतिष्ठा मिळवून दिली. गोवा येथील कंपनीचा औषधनिर्माण कारखाना उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. औषधनिर्माण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबरोबरच सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातही त्यांचे मोठे स्थान होते. त्यांच्या निधनामुळे औषधनिर्माण क्षेत्रासह सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात शोककळा पसरली असून, त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली शिवानी आणि कनिष्का, आई, दोन भाऊ, कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच असंख्य हितचिंतक असा मोठा परिवार आहे.

"खरं की काय"

पोलिसांचे 'ऑपरेशन ऑल आऊट'; एका रात्रीत 2.32 कोटींचा मुद्देमाल जप्त, 77 आरोपी जेरबंद

अवैध वाळू तस्करी, दारू, गुटखा, जुगार, शस्त्रबाजी आणि गोवंश तस्करीविरोधात धडक कारवाई



हिंदू प्रकाशवार्ता: प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाने जिल्हाभरात राबविलेल्या 'ऑपरेशन ऑल आऊट' मोहिमेत एका रात्रीत तब्बल २ कोटी ३२ लाख ४ हजार ७२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करत ७७ आरोपींना अटक केली आहे. जिल्ह्यातील अवैध धंदे व गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी ही व्यापक कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या देखरेखीखाली २० जून रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून २१ जून रोजी पहाटे ६ वाजेपर्यंत जिल्हाभर 'ऑपरेशन ऑल आऊट' राबविण्यात आले. या मोहिमेत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी सहभागी झाले होते.

अवैध वाळू तस्करीवर सर्वात मोठा घाव : गौण खनिज चोरी व अवैध वाहतुकीप्रकरणी ८ गुन्हे दाखल करून ११ वाहने जप्त करण्यात आली. या कारवाईत तब्बल १ कोटी ९८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यापूर्वी जप्त केलेल्या ६० वाहनांबाबत आणि १२ चालकांचे परवाने रद्द करण्याचा प्रस्ताव आरटीओकडे पाठविण्यात आला असून, नव्याने जप्त करण्यात आलेल्या वाहनांच्या निलंबनाची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.

दारूविरोधी कारवाईत ४० गुन्हे : गावठी हातभट्टी दारू तयार करणाऱ्यांविरुद्ध ९ गुन्हे दाखल करून ९ आरोपींना अटक करण्यात आली. या कारवाईत १,११० लिटर दारू, रसायन व साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले. त्याची किंमत ९० हजार ७५० रुपये आहे.

तसेच, बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्या ३१ आरोपींविरुद्ध ३१ गुन्हे दाखल करून ६८५ बाटल्या जप्त करण्यात आल्या. या कारवाईतील मुद्देमालाची किंमत ७४ हजार ९६५ रुपये आहे.

जुगार अड्ड्यांवर छापे : जिल्ह्यातील विविध भागांत जुगार अड्ड्यांवर टाकलेल्या छाप्यांमध्ये २० आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ८ गुन्हे दाखल करत ८२ हजार ९६० रुपये रोख रक्कम आणि १० मोटारसायकलींसह ५ लाख ३८ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शस्त्रबाजीवर लगाम : आर्म ॲक्ट अंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईत २ गावठी कट्टे, ४ जिवंत काडतुसे आणि १ तलवार जप्त करण्यात आली. याप्रकरणी २ गुन्हे दाखल करण्यात आले असून जप्त शस्त्रसामग्रीची किंमत १ लाख २३ हजार रुपये आहे.

गुटखा आणि गोवंश तस्करीविरोधातही कारवाई : प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित जर्दाची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ६ गुन्हे दाखल करून १२ लाख ३० हजार ९३२ रुपयांचा मुद्देमाल आणि एक वाहन जप्त करण्यात आले.

गोवंश तस्करी आणि कत्तलीविरोधात २ गुन्हे दाखल करून ३ आरोपींना अटक करण्यात आली. या कारवाईत १२ लाख ८४ हजार रुपये किमतीचे १२० किलो गोमांस जप्त करण्यात आले. तसेच २४ गोवंश जनावरांची सुटका करून त्यांना सुरक्षित गोशाळेत पाठविण्यात आले.

वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई : दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या चालकांविरुद्ध २ गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १३ वाहनधारकांकडून १२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

७३ गुन्हे, ७७ आरोपी अटकेत: या विशेष मोहिमेत एकूण ७३ गुन्हे दाखल करून ७७ आरोपींना अटक करण्यात आली. विविध कारवायांमधून २.३२ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी सांगितले की, जिल्ह्यातील अवैध धंदे आणि असामाजिक प्रवृत्तींविरुद्ध भविष्यातही नाकाबंदी, कोम्बिंग ऑपरेशन आणि विशेष मोहिमा राबवून कठोर कायदेशीर कारवाई सुरूच राहणार आहे.

यशवाडी दुर्घटनास्थळाला पालकमंत्र्यांची भेट; जखमींवर तत्पर आणि सर्वोत्तम उपचारांचे प्रशासनाला निर्देश

मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करत दिला धीर; आमदार डॉ. राहुल पाटील यांच्याकडूनही जखमींची विचारपूस

परभणी : जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील श्रीक्षेत्र यशवाडी येथे हनुमान मंदिर परिसरातील सभागृहाचे छत कोसळून पाच भाविकांचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. या भीषण दुर्घटनेची माहिती मिळताच परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी तातडीने दुर्घटनास्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा, आरोग्य विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून करण्यात आलेल्या बचाव व मदतकार्याचा सविस्तर आढावा घेतला.

दुर्घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर पालकमंत्री नामदार मेघनाताई बोर्डीकर यांनी तातडीने रुग्णालयात जाऊन दुर्घटनेतील जखमी रुग्णांची भेट घेतली व त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. जखमींवर होत असलेल्या उपचारांबाबत त्यांनी उपस्थित डॉक्टर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या जखमींना कोणत्याही प्रकारचा विलंब न करता तातडीने आणि सर्वोत्तम वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याच्या कडक सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भाविकांबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत पालकमंत्र्यांनी त्यांच्या शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन केले. या कठीण प्रसंगात बाधित कुटुंबीयांसोबत शासन व प्रशासन ठामपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे आणि केवळ अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या दुर्घटनेत मानवत तालुक्यातील कुंभारी बाजार येथील धनंजय श्रीकृष्ण बोचरे हा विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या नांदेड येथील यशोदा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. पालकमंत्री

काळाचा भीषण घाला! पिकअपच्या धडकेत चव्हाण कुटुंबातील चौघांचा जागीच अंत!

छत्रपती संभाजीनगर : नियती किती क्रूर असू शकते, याचा अत्यंत विदारक आणि थरकाप उडवणारा प्रत्यय पैठण तालुक्यात आला आहे. पाचोडचा आठवडी बाजार करून आनंदाने आपल्या घराकडे परतणाऱ्या एकाच कुटुंबातील चौघांना काळाने रस्त्यातच गाठले. पैठण तालुक्यातील विवाहमांडवा–चौंडाळा रोडवर एक दुचाकी आणि भरधाव पिकअप वाहनामध्ये झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील चार निष्पाप जीवांचा जागीच चक्काचूर झाला. मृतांमध्ये अवघ्या ५ वर्षांच्या चिमुकलीचाही समावेश असल्याने या घटनेने अख्खा जिल्हा सुन्न झाला असून परिसरातून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, खंडाळा येथील पारधी वस्तीवर राहणारे चव्हाण कुटुंब रविवारी पाचोड येथील आठवडी बाजार करण्यासाठी गेले होते. बाजार आटोपून संसारोपयोगी सामान घेऊन सिद्धार्थ चव्हाण हे आपल्या कुटुंबासह दुचाकीवरून (मोटारसायकल) घराकडे निघाले होते.

विवाहमांडवा ते चौंडाळा रोडवरून जात असताना, समोरून आलेल्या एका भरधाव आणि बेफाम पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण आणि भयानक होती की, दुचाकीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आणि दुचाकीवर स्वार असलेले दोन महिला, एक पुरुष आणि एक निष्पाप चिमुकली रस्त्यावर फेकले गेले. डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाल्याने या चौघांचाही जागीच अंत झाला. रस्त्यावरील रक्ताचा सडा आणि पडलेला छिन्नविच्छिन्न संसार पाहून उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला.

अपघाताची माहिती मिळताच पाचोड पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले आहेत. अपघाताला कारणीभूत ठरलेल्या पिकअप वाहनाचा आणि चालकाचा शोध पोलीस घेत असून, पाचोड पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

एकाच सरणावर जळणार चार देह!

या काळजाचे पाणी करणाऱ्या अपघातात चव्हाण कुटुंबातील दोन पिढ्या एकाच झटक्यात उद्ध्वस्त झाल्या. अपघातातील मृतांची नावे सिद्धार्थ चव्हाण (वय ३० वर्ष) – कुटुंबाचा मुख्य आधार, पायल सिद्धार्थ चव्हाण (वय २७ वर्ष) – पत्नी, आव्हान्या सिद्धार्थ चव्हाण (वय ५ वर्ष) – ५ वर्षांची निष्पाप चिमुकली, संजना अभिषेक चव्हाण (वय २२ वर्ष) – नातेवाईक महिला एक हसतं-खेळतं कुटुंब एका रात्रीत संपल्याने खंडाळा पारधी वस्तीसह संपूर्ण परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, प्रत्येक डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत आहेत.

स्वत:चे बाहेर 'लफडे' भारी, आणि घरी सतीसारख्या पत्नीवर संशयाची सुरी!

छत्रपती संभाजीनगर : "स्वतःचे पाय मातीचे आणि दुसऱ्याच्या पायावर नजर," अशा नराधम प्रवृत्तीच्या एका संशयी पतीने आधी स्वतःचे चारित्र्य बाजारात विकले आणि नंतर सतीसारख्या पवित्र पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा नरकयातना देणारा छळ मांडला. बाहेर स्वतःचे काळेबेरे आणि अनैतिक संबंध लपवण्यासाठी पत्नीला मारझोड करणाऱ्या या पापी पतीचा बुरखा अखेर फाटला आहे. पतीचे बाहेर लफडे असल्याचे उघडकीस येताच, जेव्हा हक्काच्या पत्नीने या कृत्याचा जाब विचारला आणि न्याय मागितला, तेव्हा चोर सोडून संन्याशाला फाशी देणाऱ्या सासरच्या टोळीने विवाहितेलाच बेदम चोप दिला आणि पाच लाखांच्या हुंड्यासाठी तिला घरातून हाकलून दिले. छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज एमआयडीसी पोलिसांनी या प्रकरणी संशयी पती, भोंदू सासू, दोन नणंदा आणि दिराविरुद्ध गुन्हा ठोकून खाकीचा कडक हिसका दाखवण्यास सुरुवात केली आहे.

या संतापजनक घटनेची सविस्तर पार्श्वभूमी अशी की, सध्या बजाजनगरात आपल्या वृद्ध आणि सेवानिवृत्त वडिलांच्या आश्रयाला राहणाऱ्या या पीडित विवाहितेचे लग्न ११ मे २०१४ रोजी मुंबईच्या एका ट्रॅव्हल्स व्यावसायिकाशी थाटामाटात झाले होते. पतीचा मुंबईत टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स आणि गंजलेल्या वस्तू पॉलिश करण्याचा कारखाना आहे. लग्नानंतरचे सुरुवातीचे दोन-तीन महिने सासरच्यांनी तिला चांगली वागणूक दिली, मात्र हा सुखाचा काळ अत्यंत अल्पायुषी ठरला. लवकरच सासरच्या मंडळींनी आपले खरे राक्षसी रूप दाखवण्यास सुरुवात केली. त्यांनी आधी विवाहितेच्या अंगावरील सोन्याचे दागिने ओरबाडून घेतले आणि 'तुझ्या माहेरच्यांनी लग्नात चांगला पलंग दिला नाही' या शुल्लक कारणावरून घरात रोज वाद घालण्यास सुरुवात केली. या छळामध्ये सासूने तर अजब भोंदूगिरीचा कळस गाठला होता. सासूने घरात स्वतःची हुकूमशाही गाजवण्यासाठी अंगात देवी येत असल्याचे ढोंग रचले आणि सुनेला "माझ्या अंगात देवी येते, मला रोज मालिश करून देत जा" असा अजब हुकूम सोडला. विवाहितेने या भोंदूगिरीला आणि अंधश्रद्धेला कडाडून नकार दिला असता, तिच्या दोन्ही नणंदा आणि दीर यांनी एकत्र येऊन विवाहितेला अमानुष शिवीगाळ करत तिचे घरात राहणे असह्य केले. या साऱ्या त्रासासोबतच तिचा पती सतत तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला जनावरासारखे मारझोड करत होता.

परंतु पापाचा घडा कधी ना कधी उघड होतोच, त्याप्रमाणे एका रात्री या संशयी पतीचा खरा चेहरा

सिडको चौकात वाहतुकीचा बोजवारा : रस्ते काम, बेशिस्त रिक्षा थांबे आणि वाहतूक पोलिसांचा अभाव; वाहनांच्या लांबच लांब रांगा, नागरिक संतप्त

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

छत्रपती संभाजीनगर : शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या सिडको चौकात रविवारी दुपारी पुन्हा एकदा वाहतुकीचा बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सिडकोकडून हर्सूल टी-पॉइंटकडे जाणाऱ्या मार्गावरील रस्त्याचे काम सुरू असल्याने वाहतूक सर्व्हिस रोडवर वळविण्यात आली आहे. त्यातच चौक परिसरात काही रिक्षाचालकांनी रस्त्याच्या कडेला आणि मधोमध रिक्षा उभ्या करून प्रवासी वाहतूक सुरू ठेवल्याने काही वेळातच संपूर्ण परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली.

वाहतुकीचा ताण वाढत असताना चौकात वाहतूक पोलीस नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली. चारचाकी, दुचाकी, रिक्षा तसेच मालवाहू वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक वाहनचालकांना चौक ओलांडण्यासाठी बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली.

घटनास्थळी असलेल्या नागरिकांच्या मते, सिडको चौकातील वाहतूक कोंडी ही आता नित्याची समस्या बनली आहे. रिक्षा थांब्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध असतानाही अनेक रिक्षाचालक चौकातच प्रवाशांच्या प्रतीक्षेत थांबत असल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण होतात. त्यातच सुरू असलेल्या रस्ते कामामुळे सर्व्हिस रोडवर अतिरिक्त ताण निर्माण होत असून परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, एका बाजूला मालवाहू वाहने, दुसऱ्या बाजूला रिक्षांची रांग आणि मधोमध अडकलेली चारचाकी वाहने यामुळे चौकातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. काही वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागला, तर अनेकांना कोंडीत अडकून राहावे लागले.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे सिडको चौकासाठी कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करण्याची मागणी केली आहे. रिक्षा थांब्यांचे काटेकोर पालन, बेशिस्त वाहनांवर कारवाई आणि गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलिसांची नियमित नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आगामी काळात ही समस्या आणखी गंभीर रूप धारण करण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, शहरातील महत्त्वाच्या चौकांपैकी एक असलेल्या सिडको चौकातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक आणि नागरिकांकडून होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

औद्योगिक सुरक्षेचा 'गॅस' आणि निष्पाप कामगारांचे बळी

तामिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातील पेरियापालयमजवळील कनिगईपायर गावात असलेल्या एका सागरी खाद्यप्रक्रिया उद्योगात झालेली अमोनिया वायूची गळती ही अत्यंत भीषण आणि डोळे उघडणारी दुर्घटना आहे. या दुर्दैवी घटनेत सात कामगारांना आपला जीव गमवावा लागला असून, सहासष्ट जण गंभीर अवस्थेत रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. कोणत्याही कारखान्यामध्ये किंवा प्रक्रिया उद्योगात कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे हे व्यवस्थापनाचे कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य असते. मात्र, नफ्याच्या गणितापुढे कामगारांच्या जीवाचे मोल कवडीमोलाचे ठरवले जाते, हेच या दुर्घटनेवरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. कोळंबीवर प्रक्रिया करणाऱ्या या कारखान्यात अमोनिया वायूची गळती इतक्या मोठ्या प्रमाणात झाली की, कामगारांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. हा उद्योग प्रामुख्याने उत्तर भारतातील विविध राज्यांमधून आलेल्या स्थलांतरित कामगारांच्या जीवावर चालत होता, असे समोर आले आहे. पोट भरण्यासाठी हजारो मैल दूर आलेल्या या गरिबांवर निसर्गाने नव्हे, तर मानवी निष्काळजीपणाने हा काळाचा घाला घातला आहे. अमोनिया वायूचा संपर्क आल्यामुळे कामगारांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला, चक्कर येणे आणि उलट्यांसारखी लक्षणे दिसू लागली. या सर्व बाबी कारखान्यातील आपत्कालीन यंत्रणा आणि सुरक्षा ऑडिटवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करतात. जर कारखान्यात वायूगळती शोधणारी आधुनिक उपकरणे आणि तात्काळ इशारा देणारी यंत्रणा कार्यरत असती, तर कदाचित एवढी मोठी जीवितहानी टाळता आली असती. दुर्घटनेनंतर तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी घटनेच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करून २४ तासांत अंतरिम अहवाल आणि पुढील तीन दिवसांत अंतिम अहवाल मागवला आहे, ही प्रशासकीय पातळीवर चांगली गोष्ट आहे. तसेच राज्यपालांनीही या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (NDRF) जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य राबवले नसते, तर मृतांचा आकडा आणखी वाढला असता. परंतु, अशा प्रकारच्या समित्या स्थापन करणे, अहवाल मागवणे आणि मृतांच्या नातेवाईकांबद्दल संवेदना व्यक्त करणे, एवढ्यापुरतेच सरकारचे कर्तव्य मर्यादित राहता कामा नये. अशा दुर्घटना घडल्यानंतर काही दिवस चर्चा होते आणि नंतर पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' होते, हा आजवरचा अनुभव आहे. या दुर्घटनेमुळे औद्योगिक सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत देशभरातील कारखान्यांच्या सद्यस्थितीचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रासायनिक आणि वायूंचा वापर होणाऱ्या प्रकल्पांमध्ये नियमित सुरक्षा तपासणी का केली जात नाही? व्यवस्थापनाकडून सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत असताना संबंधित सरकारी कामगार आणि औद्योगिक सुरक्षा विभाग काय करत असतो? अशा कडक प्रश्नांची उत्तरे आता शोधावी लागतील. या दुर्घटनेची निष्पक्ष चौकशी करून केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई न करता, दोषी व्यवस्थापन आणि गुत्तेदारांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल झाले पाहिजेत. जोपर्यंत अशा निष्काळजीपणाबद्दल कठोर आणि दाखवण्यासारखी कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत निष्पाप कामगारांचे बळी असेच जात राहतील.

जागतिक योग दिन : शरीर, मन आणि आत्म्याच्या समतोलाचा वैश्विक उत्सव

"योग म्हणजे स्वतःशी, समाजाशी, निसर्गाशी आणि संपूर्ण विश्वाशी सुसंवाद साधण्याची कला होय."

मानवाच्या प्रगतीचा इतिहास हा केवळ भौतिक यशाचा इतिहास नाही; तो मानसिक शांतता, नैतिक मूल्ये आणि आत्मिक उन्नतीच्या शोधाचाही इतिहास आहे. विज्ञानाने मानवाला वेग दिला, तंत्रज्ञानाने सुविधा दिल्या; परंतु मनःशांती, संतुलन आणि अंतर्मनातील आनंद यांचा शोध आजही सुरू आहे. या शोधाचे उत्तर भारतीय संस्कृतीने हजारो वर्षांपूर्वी 'योग' या रूपाने जगाला दिले. म्हणूनच आज योग ही केवळ भारताची परंपरा नसून संपूर्ण मानवजातीची अमूल्य सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संपत्ती बनली आहे.

दरवर्षी २१ जून रोजी साजरा होणारा जागतिक योग दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नाही, तर निरोगी, संतुलित आणि मूल्यसमृद्ध जीवन जगण्याचा जागतिक संकल्प आहे.

योग : भारताची विश्वाला दिलेली अमूल्य देणगी

योगाचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीचा आहे. महर्षी पतंजली यांनी योगसूत्रांद्वारे योगशास्त्राला शास्त्रीय स्वरूप दिले. "योगश्चित्तवृत्ती निरोधः" या त्यांच्या सूत्रात योगाचे सार दडलेले आहे. मनातील चंचल विचारांवर नियंत्रण मिळवून अंतर्मनाला स्थैर्य प्राप्त करून देणे म्हणजे योग.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण म्हणतात—

"समत्वं योग उच्यते."

म्हणजेच सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी यामध्ये मनाचे संतुलन राखणे म्हणजे योग.

यावरून योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून जीवन जगण्याची एक व्यापक आणि सुसंस्कृत पद्धत असल्याचे स्पष्ट होते.

जागतिक योग दिनाची प्रेरणादायी वाटचाल

सप्टेंबर २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला विक्रमी १७५ देशांचा पाठिंबा मिळाला. डिसेंबर २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी अधिकृत मान्यता दिली आणि २१ जून २०१५ रोजी पहिला जागतिक योग दिन जगभर साजरा करण्यात आला.

हा प्रसंग केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी महत्त्वाचा ठरला. कारण जगाने एका प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचा स्वीकार करून आरोग्य आणि शांततेचा सार्वत्रिक संदेश स्वीकारला.

२१ जूनचे वैशिष्ट्य

२१ जून हा उत्तर गोलार्धातील वर्षातील सर्वांत मोठा दिवस मानला जातो. सूर्यप्रकाशाचा कालावधी अधिक असल्याने हा दिवस ऊर्जा, प्रकाश, जागरूकता आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो. भारतीय परंपरेनुसार या दिवसानंतर दक्षिणायनाची सुरुवात होते. त्यामुळे आध्यात्मिक साधनेसाठीही या दिवसाला विशेष महत्त्व आहे.

आधुनिक युगातील योगाचे वाढते महत्त्व

आजचा माणूस अनेक सुविधांनी संपन्न असला तरी तो तणाव, चिंता, नैराश्य, स्पर्धा आणि असंतुलित जीवनशैलीने त्रस्त आहे. मोबाईल, संगणक आणि सामाजिक माध्यमांमुळे शारीरिक हालचाल कमी झाली आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

अशा परिस्थितीत योग एक प्रभावी उपाय म्हणून समोर येतो.

योगाचे शारीरिक फायदे

शरीर लवचिक आणि मजबूत बनते.

हृदयाचे आरोग्य सुधारते.

मधुमेह, उच्च रक्तदाब आणि स्थूलता नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

श्वसनसंस्थेची कार्यक्षमता वाढते.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.

योगाचे मानसिक फायदे

तणाव आणि चिंता कमी होतात.

एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढते.

आत्मविश्वास वाढतो.

सकारात्मक विचारसरणी विकसित होते.

मानसिक स्थैर्य प्राप्त होते.

योगाचे आध्यात्मिक फायदे

आत्मचिंतनाची सवय लागते.

जीवनातील उद्दिष्टे स्पष्ट होतात.

करुणा, संयम आणि सहिष्णुता वाढते.

अंतर्मनातील शांततेचा अनुभव मिळतो.

जीवन बदलणारी काही प्रेरणादायी उदाहरणे

१. विद्यार्थ्यांसाठी योग

परीक्षेच्या काळात अनेक विद्यार्थी तणावाखाली असतात. नियमित अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम आणि ध्यान केल्याने त्यांची एकाग्रता वाढते आणि अभ्यास अधिक परिणामकारक होतो.

२. कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी योग

संगणकासमोर तासन्तास बसून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाठदुखी, मानदुखी आणि मानसिक ताण जाणवतो. ताडासन, भुजंगासन आणि वज्रासन यांसारखी आसने त्यांना मोठा दिलासा देऊ शकतात.

३. ज्येष्ठ नागरिकांसाठी योग

वृद्धावस्थेत शरीराची हालचाल कमी होते. हलका योग, प्राणायाम आणि ध्यान यांमुळे रक्ताभिसरण सुधारते, मन प्रसन्न राहते आणि जीवनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.

४. कोविडनंतरचे वास्तव

कोविड-१९ महामारीच्या काळात लाखो लोकांनी घरबसल्या योग आणि प्राणायामाचा आधार घेतला. अनेकांनी मानसिक तणावावर मात केली आणि आरोग्य टिकवून ठेवले. यामुळे योगाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले.

योग आणि भारतीय संस्कृती

भारतीय संस्कृती नेहमीच संतुलन, संयम आणि सहअस्तित्वाचा संदेश देते. योग ही त्याच संस्कृतीची जीवनदायी अभिव्यक्ती आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांतही आत्मसंयम, साधना आणि अंतर्मनाच्या विकासाचे महत्त्व अधोरेखित केलेले दिसते.

संत तुकाराम महाराज म्हणतात—

"मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण."

मन प्रसन्न ठेवण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे योग.

पर्यावरण आणि योग

योग आपल्याला निसर्गाशी एकरूप होण्याची शिकवण देतो. सकाळच्या स्वच्छ वातावरणात सूर्यनमस्कार करणे, वृक्षांच्या सान्निध्यात ध्यानधारणा करणे आणि निसर्गाशी सुसंवाद साधणे हे योगाचेच विस्तृत रूप आहे. त्यामुळे योग हा पर्यावरणपूरक आणि शाश्वत जीवनशैलीचा आधारस्तंभ ठरतो.

आजची खरी गरज

आज मानवाकडे संपत्ती आहे, पण समाधान कमी आहे; माहिती आहे, पण मनःशांती कमी आहे; साधने आहेत, पण साधना कमी आहे. अशा काळात योग आपल्याला स्वतःकडे परत नेतो. योग आपल्याला शिकवतो की खरा विकास हा केवळ बाह्य प्रगतीत नसून अंतर्मनाच्या समृद्धीत आहे.

योग हा कोणत्याही धर्म, पंथ किंवा देशापुरता मर्यादित नाही. तो संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग आहे. म्हणूनच जागतिक योग दिनाचा संदेश केवळ एक दिवसापुरता न ठेवता तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणे आवश्यक आहे.

उपसंहार

जागतिक योग दिन आपल्याला स्मरण करून देतो की निरोगी शरीर, शांत मन आणि जागृत आत्मा यांच्याशिवाय खरे सुख प्राप्त होऊ शकत नाही. योग ही भारताने जगाला दिलेली अशी देणगी आहे जी काळाच्या कसोटीवर टिकली आहे आणि भविष्यातही मानवजातीला दिशा देत राहील.

चला, या योग दिनी आपण सर्वजण एक संकल्प करूया—

"दररोज काही वेळ योगासाठी, आयुष्यभर आरोग्य, आनंद आणि आत्मशांतीसाठी."

योग हा व्यायाम नाही, तो जीवनाचा उत्सव आहे. योग ही सवय नाही, ती संस्कारांची वाट आहे. योग ही क्रिया नाही, ती आत्मजागृतीची प्रक्रिया आहे.

जागतिक योग दिनाच्या सर्व योगसाधकांना, योगप्रेमींना आणि आरोग्यदायी जीवनाचा ध्यास घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीस हार्दिक शुभेच्छा!

— लेखक : पांडुरंग मारुती धुमाळ, निवृत्त शिक्षक, सांगली

विद्यार्थ्यांचे जीव जात आहेत, शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाला जबाबदार कोण?

देशाच्या भवितव्याचा पाया असलेले विद्यार्थी आज भीती, नैराश्य आणि असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलले जात आहेत. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, पुनर्परीक्षा, वाढता मानसिक ताण आणि त्यातून घडणाऱ्या आत्महत्या या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. त्या आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या गंभीर अपयशाचे प्रतीक बनल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेले खुले पत्र देशातील लाखो विद्यार्थी आणि पालकांच्या वेदनेला शब्द देणारे ठरले आहे. या पत्रात अलिकडच्या काही आठवड्यांत ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यापैकी पाच विद्यार्थ्यांचे मृत्यू अवघ्या ४८ तासांत झाले. ही आकडेवारी केवळ संख्या नाही तर ती उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांची, तुटलेल्या स्वप्नांची आणि व्यवस्थेवरील विश्वास गमावलेल्या तरुणाईची वेदनादायी कहाणी आहे. प्रत्येक आत्महत्येमागे एका कुटुंबाचा संघर्ष, त्याग आणि मुलांच्या भविष्याविषयीच्या अपेक्षा दडलेल्या असतात.

आज शिक्षण हे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सर्वात मोठी गुंतवणूक बनले आहे. मुलांना डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी किंवा इतर प्रतिष्ठित क्षेत्रांत पोहोचवण्यासाठी पालक कर्ज काढतात, जमीन विकतात आणि आयुष्यभराची बचत खर्च करतात. मात्र परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार, पेपरफुटी आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले की या कुटुंबांवर दुहेरी संकट कोसळते. एकीकडे मुलाचे निधन आणि दुसरीकडे आर्थिक विनाश. याच पार्श्वभूमीवर दिपके यांनी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. या मागणीचा गाभा आर्थिक मदतीपेक्षा राज्याच्या नैतिक जबाबदारीशी संबंधित आहे. जर व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. केवळ शोक व्यक्त करून किंवा चौकशी समित्या नेमून शासनाची जबाबदारी संपत नाही.

गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटना वारंवार घडल्या आहेत. लाखो विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षा देतात आणि नंतर पेपरफुटीमुळे पुनर्परीक्षेची वेळ येते. यामुळे केवळ वेळ आणि पैसा वाया जात नाही, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो. मेहनतीपेक्षा गैरव्यवहाराला महत्त्व मिळत असल्याची भावना तरुणांच्या मनात निर्माण होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची बाब आहे. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे शिक्षण व्यवस्थेचे वाढते व्यापारीकरण. महागडे कोचिंग क्लासेस, वाढती फी, स्पर्धेचे प्रचंड दडपण आणि यशाला दिले जाणारे अवास्तव महत्त्व यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत आहे. अनेकदा अपयश हे जीवनाचा भाग आहे हे सांगण्याऐवजी त्याला कलंक मानले जाते. परिणामी अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या एकाकी पडतात. आत्महत्या ही वैयक्तिक कमकुवतपणाची नव्हे, तर सामाजिक आणि संस्थात्मक अपयशाची घटना असते, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे.

दिपके यांच्या पत्रात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक असते. मात्र केवळ एका व्यक्तीच्या बदलाने समस्या सुटणार नाही. परीक्षा प्रणाली, भरती प्रक्रिया, नियोजन यंत्रणा आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित धोरणांचे व्यापक पुनर्मूल्यांकन करणे तितकेच गरजेचे आहे. आज विद्यार्थी सरकारकडे केवळ नोकऱ्या किंवा परीक्षा मागत नाहीत तर ते न्याय आणि पारदर्शकता मागत आहेत. त्यांना खात्री हवी आहे की त्यांच्या मेहनतीची चोरी होणार नाही. त्यांना अशी व्यवस्था हवी आहे जिथे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळणार नाही आणि प्रामाणिक प्रयत्नांना योग्य संधी मिळेल. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा पाया असतो. तोच जर ढासळला तर सामाजिक अस्थिरता निर्माण होण्याचा धोका वाढतो.

विद्यार्थी आत्महत्यांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा सामाजिक न्याय, शिक्षणाचा अधिकार आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. एखादी रेल्वे दुर्घटना किंवा पूल दुर्घटना घडली तर जबाबदारी निश्चित केली जाते. मग विद्यार्थ्यांच्या मृत्यूंच्या मालिकेनंतरही शिक्षण व्यवस्थेतील दोषींना जबाबदार का धरले जात नाही, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. या परिस्थितीत व्यापक सुधारणांची गरज आहे. परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, पेपरफुटी विरोधी कठोर कायदे, दोषींवर तातडीने कारवाई, विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य केंद्रे, मोफत समुपदेशन सेवा आणि पालकांसाठी जागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच आत्महत्यांच्या घटनांचा सखोल अभ्यास करून त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय कारणे शोधली पाहिजेत. दिपके यांचे पत्र हे केवळ एका राजकीय पक्षाचे निवेदन म्हणून पाहण्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेला विचारलेला अस्वस्थ करणारा प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे.

देशाचा तरुण वर्ग जर आशाहीन झाला, तर कोणत्याही राष्ट्राचे भविष्य सुरक्षित राहू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जिवंत ठेवणे ही केवळ पालकांची नव्हे, तर राज्याचीही जबाबदारी आहे. आज प्रश्न एकाच विद्यार्थ्याचा किंवा एका परीक्षेचा नाही. प्रश्न आहे त्या संपूर्ण पिढीचा जी आपल्या भवितव्यासाठी संघर्ष करत आहे. त्यांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे देशाच्या भविष्याकडे दुर्लक्ष करणे होय. आता प्रश्न एवढाच आहे की विद्यार्थ्यांच्या मृत्यूंचा हिशोब कोण देणार? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात असा प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी शासन, प्रशासन आणि समाज कोणती ठोस पावले उचलणार? कारण प्रत्येक हरवलेला विद्यार्थी हा केवळ एका कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण राष्ट्राचा अपूर्ण राहिलेला भविष्यकाळ असतो.

- प्रवीण बागडे, नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ग्रामीण पोलिसांचा योगाभ्यास; निरोगी पोलीस, सक्षम समाजाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने गोकुळ मैदानावर विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६ वाजता पार पडलेल्या या शिबिरात पोलीस अधिकारी व अंमलदारांनी उत्साहाने सहभाग घेत योगाभ्यासाचा संकल्प केला.

या कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्यासह २०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'योग : कर्मसु कौशलम्' या संकल्पनेला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात वॉर्मअप, सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन आदी विविध योगासने तसेच प्राणायामाचे प्रात्यक्षिक व सराव करण्यात आला. यंदाच्या 'योगा फॉर हेल्दी एजिंग' या संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलातील तणावपूर्ण व धावपळीच्या जीवनशैलीत योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र म्हणाले की, पोलीस दलातील जबाबदाऱ्या आणि कामाचा ताण लक्षात घेता योगाची नित्य साधना अत्यंत आवश्यक आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. योगामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता सुधारते तसेच मानसिक तणावावर नियंत्रण मिळवता येते, असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनीही योगाला दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन केले. योग हा केवळ व्यायाम नसून शरीर, मन आणि समाज यांना जोडणारे प्रभावी माध्यम आहे. महर्षी पतंजली यांनी सांगितलेल्या अष्टांग योगाच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास अधिक सक्षम, तणावमुक्त आणि कार्यक्षम जीवन जगता येते, असे ते म्हणाले.

प्राचीन भारतीय योग परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत ग्रामीण पोलीस दलाने आयोजित केलेल्या या उपक्रमातून 'निरोगी पोलीस, सक्षम समाज' हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासह नियमित योगाभ्यासाची प्रेरणा देण्यात आली.

महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देणार : मुख्यमंत्री

मुंबई : "राज्य विधिमंडळाचे सोमवारपासून सुरू होणारे पावसाळी अधिवेशन पूर्ण वेळ म्हणजे तीन आठवडे चालणार असून, यामध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक मोठे निर्णय घेतले जातील. या अधिवेशनात सरकार एकूण १० महत्त्वाची विधेयके मांडणार आहे. यामध्ये शेतात राबणाऱ्या पण उपेक्षित राहिलेल्या महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देण्याचे अत्यंत क्रांतिकारी विधेयक सरकार घेऊन येत आहे," अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह वरिष्ठ मंत्री उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, "अधिवेशनात आमचा प्रयत्न संवादाचाच असून, विरोधकांनी हिताची चर्चा केली तर हितकारक उत्तरे मिळतील; मात्र राजकारण केले तर राजकीय उत्तर दिले जाईल," असा इशाराही त्यांनी दिला.

विरोधकांच्या बहिष्कारावर खोचक टोला लगावताना मुख्यमंत्री म्हणाले की, विरोधक चर्चेला आले असते तर निश्चित संवाद घडला असता. मात्र, त्यांनी येण्याऐवजी आधीच सह्या गोळा करून ६ पानांचे पत्र जोडले आहे. विरोधकांनी पाठवलेले हे पत्र पाहिले तर ते 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि 'चॅटजीपीटी'च्या मदतीने तयार केल्याचे स्पष्ट दिसते. म्हणजे पत्र लिहिण्यासाठीही आता विरोधकांकडे स्वतःचे विषय, कल्पकता किंवा प्रश्नांचे आकलन उरलेले नाही. पण, एका गोष्टीचा आनंद आहे की ते तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहेत, यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या पत्रातील एक पॅराग्राफ तर २०२३ पासून तोच आहे, त्यावर कारवाई झाली तरी तोच मजकूर पुन्हा टाकला जातो. लोकांना अपेक्षित असलेले मुद्दे विरोधकांना माहीतच नाहीत. जयंतराव पत्रकार परिषदेला वेळेवर पोहोचले कारण आम्ही 'कनेक्टिंग लिंक' तयार केल्यामुळे ते ट्रॅफिकमध्ये अडकले नाहीत. विशेष म्हणजे विरोधकांचा 'अल-निनो'ला सुद्धा आमच्याशी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे; हे सुद्धा त्यांनी चॅटजीपीटीला विचारले असते तर असे विधान केले नसते," अशी कोपरखळी मुख्यमंत्र्यांनी काढली.

जीवनातील उत्साह टिकवण्यासाठी योग साधना आवश्यक : जाधव

शासकीय ग्रंथालयात योग दिन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : वर्तमान युगातील मानवी जीवनशैली लक्षात घेता दैनंदिनी आयुष्यात आनंद, उत्साह आणि शारीरिक सुदृढता टिकून ठेवण्यासाठी योग साधना आवश्यक आहे, असे मत शासकीय विभागीय ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी व्यक्त केले.

शासकीय विभागीय ग्रंथालय आणि मॉडर्न महाविद्यालय व सावित्रीमाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शासकीय विभागीय ग्रंथालय येथे रविवारी, २१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी जाधव बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. नामदेव सानप, कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेंद्र भगत, प्रा. ज्योती मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जाधव म्हणाले, गतिशील जीवनशैलीमुळे शारीरिक संपत्तीकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी विविध समस्या उद्भवत आहेत. त्या टाळून सुदृढ आरोग्य प्राप्त करून जीवनातील आनंद व उत्साह टिकून ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी योग साधना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

सकाळी सात ते आठ या वेळेत विभागीय ग्रंथालय, महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांनी योगसाधना केली. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी केले. प्रा. राजेंद्र भगत यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावित्रीमाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. ज्योती मोरे आणि विभागीय ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दत्त मंदिर बीड बायपास येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर : 21 जून 2026 रोजी बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन पतंजली योग संस्थे तर्फे दत्त मंदिर बीड बायपास छत्रपती संभाजीनगर येथे योगाचार्य अरविंद बाराते सर यांनी योग वर्गाचे संचालन केले तसेच मानवी जीवनामध्ये योगाचे महत्त्व पटवून सांगितले.

सदरील कार्यक्रमात ज्येष्ठ योग शिक्षक सुखाचे सर कुलकर्णी सर सवाईराम सर तसेच महिला योगशिक्षिका मुक्ताताई दांगोडे त्याचबरोबर लाटेताई तसेच लगाने मॅडम उपस्थित होते . तसेच औरंगाबाद जिल्हा पतंजली योग संस्थेचे अरविंद बाराते सर महामंत्री म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत सोबत सह प्रभारी भारत स्वाभिमान ट्रस्ट, सहप्रभारी राजू पवार छत्रपती संभाजी नगर हे उपस्थित होते

आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता | प्रतिनिधी

अंधारीत : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रशाला येथे विविध योगासनांचे प्रात्यक्षिक आणि सामूहिक योगाभ्यासाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व योग दिनाच्या उद्देशाविषयी माहिती देऊन करण्यात आली. योग प्रशिक्षकांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन तसेच प्राणायाम यांचे महत्त्व सांगून प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहते, तणाव कमी होतो आणि जीवनशैली अधिक निरोगी बनते, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकनाथ जाधव होते. त्यांनी आपल्या मनोगतात योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, कर्मचारी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

योग ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली; बॉटनिकल गार्डनमध्ये विशेष योग शिबिर संपन्न

मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती; शेकडो नागरिकांचा सामूहिक योगाभ्यासात सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बाळासाहेब ठाकरे उद्यान (बॉटनिकल गार्डन) येथे आयोजित विशेष योग शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राज्याचे मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार नामदार अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात शेकडो नागरिकांनी सामूहिक योगाभ्यास करत निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

यावेळी माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य जीवनपद्धती असून शारीरिक स्वास्थ्याबरोबरच मानसिक संतुलन आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी समाज निर्मितीसाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा सत्रांचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी एकाग्रतेने योगाभ्यास करत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात संपूर्ण परिसर योगमय झाला होता.

कार्यक्रमास विवेक देशपांडे, डॉ. उत्तमराव काळवणे, संजय औरंगाबादकर, कैलास जाधव, दिनेश देशपांडे, सुरेश देशपांडे, आनंदजी अग्रवाल, वर्षाताई देशपांडे, भाऊ सुरडकर, शिवाजी दांडगे, विश्वनाथ स्वामी, माधुरीताई अदवंत, मीनाताई खरात, मयूर वंजारी, गणेश नावंदर, गोकुळ मलके, राजू वाडेकर, प्रशांत नांदेडकर, नितीन खरात, अरुण पालवे, अविनाश पवार, रोहित स्वामी, सुधीर शेवाळे, हुशारसिंग चव्हाण, विशाल खंडागळे, आकाश अंतरकर आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून योगाचे महत्त्व अधिक व्यापकपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचले असून आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती करण्याचा उद्देश सफल झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

सोयगाव,दि.२१ जून : संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार हे उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी योगामुळे शारीरिक आरोग्य सुदृढ राहण्याबरोबरच मानसिक शांतता, सकारात्मकता आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते, असे सांगितले. नियमित योगाभ्यास हा निरोगी व संतुलित जीवनशैलीचा आधार असल्याचेही त्यांनी प्रतिपादन केले.योग प्रशिक्षक डॉ. निलेश गाडेकर आणि प्रा. विनोद चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम तसेच ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून घेतले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत योगाभ्यासात सहभाग घेतला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नियमित योगाभ्यास करून निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील चौधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. निलेश गावडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील चौधरे, डॉ. निलेश गावडे, डॉ. पंकज गावित तसेच क्रीडा विभागाचे विभागप्रमुख

योग ही भारताची जगाला अमूल्य देण : डॉ. धारूरकर

मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे योग दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर : योग ही भारताची जगाला अमूल्य देण आहे, असे प्रतिपादन डॉ. वि. ल. धारूरकर यांनी केले. मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सिडको एन-२ मधील ठाकरेनगर उद्यानात आयोजित योगसाधना कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी प्रवीण घुगे, मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, मनोज शेवाळे, अनिल टाकळकर, शिवाजी शिवणीकर, सुमित गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. धारूरकर म्हणाले, महर्षी पतंजली यांनी श्वसन संस्था, रक्ताभिसरण आणि पचन संस्था याबाबत सखोल संशोधन करून सुलभ योग आपल्यासाठी उपलब्ध करून दिले. जग जेव्हा अंधारात चाचपडत होते, तेव्हा भारत देश योगामुळे प्रकाशमान होता. संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केल्यामुळे भारतातील योगाचे महत्त्व जगभर पसरले. या वर्षाची संकल्पना निरोगी वृद्धत्वासाठी योग अशी आहे.

धावपळीच्या व ताण-तणावाच्या दैनंदिन जीवनात उपयोगी योगासने व प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक आचार्य जयप्रकाश बागडे यांनी करून घेतले. प्रस्ताविकात नरहरी शिवपुरे यांनी मंडळाच्या विविध लोकाभिमुख व समाजउपयोगी विविध उपक्रमांबाबत माहिती दिली. आभार नामदेव कराड यांनी मानले. याप्रसंगी धनंजय ब्रह्मपूरकर, ज्ञानेश्वर शिंदे, डॉ. मनोहर बन्सवाल, राजू सानप, बालाजी बिरादार, प्रकाश मोरे, पुराणिक, स्वामी, किड्स गॅलेक्सी ग्लोबल स्कूलचे विद्यार्थी, ठाकरेनगरमधील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन रुद्रे, कुणाल राठोड, अर्चना पवार, कार्तिक चव्हाण, गणेश कोलते यांनी परिश्रम घेतले

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा परिषदेत योग शिबिर

योग शिबिरासह वृक्षारोपण; निरोगी जीवनासाठी योगाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा परिषद परिसरात रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या जिल्हा आयुष कक्ष, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि भारतीय योग संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत झालेल्या योग सत्रात लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील योग प्रशिक्षक डॉ. विजय काथार, कविता पिसोळकर, अर्चना पटेल, श्रद्धा पाठक, सुनीता कावळे, महालक्ष्मी गौडा आणि हरिभाऊ पवार यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, प्राणायाम व ध्यानधारणा यांची प्रात्यक्षिके सादर करत योगाचे महत्त्व पटवून दिले. चाटे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक योगासने सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

यंदाच्या योग दिनानिमित्त 'निरोगी शरीरात निरोगी मन, निरोगी वृद्धत्वासाठी योग' हा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, लेखाधिकारी संजय गादीकर, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, सीमा मेहेत्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल यांनी योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होत असल्याचे सांगितले. समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी दैनंदिन जीवनात योग व प्राणायामाचा समावेश करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे आणि उपशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. क्रीडा शिक्षक कृष्णा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर जिल्हा आयुष अधिकारी डॉ. शकील शेख यांनी आभार मानले.

ऑनलाईन चक्री जुगारावर कारवाई

पैठण दि २१ :- पैठण एम आय डी सी पोलीस स्टेशन हद्दीतील संत एकनाथ साखर कारखाण्यासमोर एका पत्राच्या शेडमध्ये चालणाऱ्या ऑनलाईन चक्री जुगारावर स.पो.नि भारत मोरे यांच्या पथकाने कारवाई केली असून या ठिकाणाहून जुगार साहित्य तसेच जुगार चालवाणाऱ्या कृष्णा तांबे या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सपोनि भरत मोरे, उप पो नि.दशर बुरकुल, पो. कॉ. करतारसिंग सिंघल ,पंडित, कृष्णा उगले, करतरसिंग सिंगल, गोपाळघरे आदींचा या कारवाईत सहभाग होता.

CHANGE OF NAME हिंदू प्रकाशवार्ता

OLD NAME SHEIKH KHALID SHEIKH GULAB Residing At Infront Of SBH Bank Jalgaon Road Ajanta At Post Ajanta Tal Sillod Dist Aurangabad Maharashtra 431117 New Name Address SHAIKH KHALED SHAIKH GULAB Infront Of SBI Bank Jalgaon Road At Post Ajanta Tal .Sillod Dist Chhatrpati Sambhaji Nagar Maharashtra 431117

रायझिंग स्टार इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर : रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल येथे 21 जून आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. 'योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून सदृढ शरीर आणि निरोगी मनासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी योगाचे महत्त्व,त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहण्यास, मन एकाग्र होण्यास तसेच तणाव कमी करण्यास मदत होते, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी भारती नाईक मॅडम यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगत विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखविली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासनांचा सराव केला.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे आवाहन केले. योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून निरोगी जीवनशैलीसाठी योग अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री. सुभाष निकम, सचिव अरुण निकम, मुख्याध्यापिका दिपाली वाकळे, मुख्याध्यापक अतुल निकम, उपमुख्याध्यापिका स्वाती निकम, संदीप चव्हाण, ज्योती बोर्डे, क्रीडा शिक्षक संतोष आवचार, तुषार थोरात तसेच शिक्षकवृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत योग दिनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला.

सातत्याने योग करत रहा, जीवनात चांगले योग येतील – आमदार प्रशांत बंब

रांजणगाव शे. पू. येथे योग दिन साजरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सातत्याने योग करत रहा जीवनात चांगले योग येतील. योग ही केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्याची गुरुकिल्ली आहे," असे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रांजणगाव शे. पू. येथील माऊंट व्हॅली इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रशांत बंब उपस्थित होते. कार्यक्रमात योग समितीचे जिल्हा संयोजक अविनाश गायकवाड, महिला पतंजली योग समितीच्या युवती जिल्हा प्रभारी तथा सहसंयोजक जानवी गायकवाड, भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा महामंत्री ज्योती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी "करो योग, रहो निरोग" हा संदेश देत विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सभापती, उपसभापती, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन दीपक बडे यांनी केले. तसेच माऊंट व्हॅली इंग्लिश स्कूलसह परिसरातील विविध शाळांचे विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, योगप्रेमी नागरिक आणि शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योगाभ्यास, प्राणायाम आणि आरोग्यविषयक मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साहाचे वातावरण लाभले.

घाटी रुग्णालयात योग दिन उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त यंदाच्या "निरोगी वृद्धत्वासाठी योग" या संकल्पनेला अनुसरून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे रविवारी योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात योगाचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्य संवर्धनातील महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी भारतीय युवक संस्थेच्या योग प्रशिक्षक विद्या किशोर ताकसांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित राहून विविध योगासने, प्राणायाम तसेच निरोगी जीवनशैलीसाठी आवश्यक योगाभ्यासाचे प्रात्यक्षिक सादर केले. उपस्थितांना योगाचे महत्त्व समजावून सांगत प्रत्यक्ष योगाभ्यास करून घेण्यात आला.

यावेळी उपाधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, डॉ. के. डी. गर्कळ, डॉ. विनोद मुंदडा, डॉ. प्रभा खैरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचेता जोशी, डॉ. शैलजा राव, डॉ. अमोल जोशी, नर्सिंग महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता पालवे, डॉ. राधेय खेत्रे, डॉ. महेश सोनपेठकर, डॉ. तपन जक्कल, शारीरिक प्रशिक्षण निर्देशिका आशिका कनक बरालिया, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, मुकेश भोसले, सुजित खिल्लारे तसेच प्राध्यापक, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह सुमारे १७० हून अधिक सहभागींची उपस्थिती लाभली. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यासाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी नियमित योगाभ्यासाद्वारे निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला. तसेच योग दिनानिमित्त सहभागी विद्यार्थ्यांना अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते रोपांचे वितरण करण्यात आले. यावेळी वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचा संकल्पही करण्यात आला.

अजिंठा लेणीत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

फर्दापूर, दि. २१ : जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात शनिवारी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. निसर्गरम्य वातावरण आणि ऐतिहासिक वारशाच्या सान्निध्यात आयोजित करण्यात आलेल्या या योग शिबिरात पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच विविध विभागांतील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

रविवारी सकाळी आठ वाजता अजिंठा लेणी परिसरात योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे सत्र आयोजित करण्यात आले. जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणीच्या शांत आणि प्रसन्न वातावरणात योगाभ्यास केल्याने सहभागींच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

यावेळी पुरातत्त्व विभागाचे प्रमुख मनोज पवार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापक राज पाटील यांच्यासह पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच केमिकल विभागातील कर्मचाऱ्यांनी योगाभ्यास करून आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविला.

योगामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, तसेच दैनंदिन जीवनातील तणाव कमी करून शरीरात नवचैतन्य निर्माण होते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणी परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाल्यामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, निसर्ग आणि संस्कृतीच्या सान्निध्यात योगाचा संदेश देण्याचा प्रयत्न यशस्वी ठरल्याची भावना सहभागी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

छत्रपती संभाजीनगर
सोमवार, दि. २२ जून २०२६

मा. प्रदेशाध्यक्ष डॉ. संजय जैस्वाल यांची ॲड. श्रीरंग देशपांडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा बिहारमधील पश्चिम चंपारण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. संजय जैस्वाल यांनी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यादरम्यान प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. श्रीरंग देशपांडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान सामाजिक, राजकीय तसेच विविध विकासात्मक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. स्नेहपूर्ण वातावरणात झालेल्या या भेटीत समकालीन घडामोडी आणि जनहिताच्या मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्यात आली. यावेळी माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे, माजी महापौर बापू घडामोडे तसेच भाजपचे सरचिटणीस व नगरसेवक रामेश्वर भादवे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. संजय जैस्वाल यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या सदिच्छा भेटीमुळे परस्पर संवाद आणि सामाजिक-राजकीय विषयांवरील चर्चा अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

बिडकीनच्या पाच तरुणांचे मृतदेह हाती; गावात आक्रोश

पोलीस प्रशासनाकडून रात्री उशिरा मृतदेह बिडकीनकडे रवाना

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

बिडकीन दि. २१ जून : रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी गेलेल्या बिडकीन येथील पाच तरुणांचे मृतदेह शोधण्यात प्रशासनाला यश आले आहे. रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे आणि बिडकीन येथील सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राबविण्यात आलेल्या शोधमोहिमेदरम्यान पाचही तरुणांचे मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्हा आणि विशेषतः बिडकीन परिसरावर शोककळा पसरली आहे. शनिवारी सकाळी बिडकीन येथून १९ जणांचा एक गट पर्यटनासाठी गणपतीपुळे येथे गेला होता. सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना काही तरुण पाण्यात उतरले. मात्र समुद्रातील तीव्र लाटा आणि पाण्याचा वेगवान अंतर्गत प्रवाह यांचा अंदाज न आल्याने पाच जण खोल पाण्यात ओढले गेले. घटनेची माहिती मिळताच पोलीस, स्थानिक जीवरक्षक आणि प्रशासनाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली.

शोधमोहिमेदरम्यान प्रेम आदमाने, अनिकेत हिवराळे, यश कांबळे, आनंद नरवडे आणि आदित्य राऊत या पाच तरुणांचे मृतदेह हाती लागले. समुद्रातील पाण्याचा प्रचंड वेग आणि प्रतिकूल परिस्थिती असूनही सर्व यंत्रणांनी समन्वयाने शोधकार्य राबविले. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी सांगितले की, सापडलेल्या पाचही मृतदेहांवर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ते रात्री उशिरा छत्रपती संभाजीनगरकडे रवाना करण्यात आले आहेत. गणपतीपुळे येथे उपस्थित सामाजिक कार्यकर्ते आणि बिडकीन ग्रामस्थांच्या माहितीनुसार, मृतदेह रात्री उशिरापर्यंत गावात पोहोचण्याची शक्यता आहे. पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या या तरुणांचा असा दुर्दैवी आणि करुण अंत झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण बिडकीन गाव शोकसागरात बुडाले असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत तरुणांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे.

अज्ञाताने फोडली सोलार प्लेट; शेतकऱ्याची पोलिसांत धाव

फुलंब्री प्रतिनिधी दि. 21 : फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथील शेतकरी अब्दुल रहीम बुढन शेख (वय 55) यांच्या शेतातील सोलार प्लेट अज्ञात व्यक्तीने दगड मारून फोडल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी त्यांनी वडोद बाजार पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, 20 जून 2026 रोजी दुपारी सुमारे 2 वाजेच्या सुमारास ते खामगाव शिवारातील गट क्रमांक 189 मधील शेतात गेले असता, शेतातील सोलार प्लेट फोडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात व्यक्तीने दगड मारून सोलार प्लेटचे नुकसान केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या घटनेमुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून संबंधित अज्ञात आरोपीचा शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. पोलिसांनी तक्रार नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

हजारोंचे अश्रू पुसणाऱ्या स्मशान जोग्यांचा भव्य सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ व उद्योजक अभियंता डॉ. डी. एस. काटे यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये सेवा बजावणाऱ्या ४० हून अधिक स्मशान जोग्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. क्रांती चौक येथील हॉटेल मॅनोरमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाने सामाजिक बांधिलकीचा वेगळा आदर्श निर्माण केला.

या प्रसंगी माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, शेषराव चव्हाण, अनिल मकरिये, डॉ. दिलीप घारे, एकनाथ जाधव, सुभाष पाटील, प्रा. डॉ. शिवानंद भानुसे, कवी विष्णू सुरासे, ॲड. अजित काळे तसेच स्मशान जोगी संघटनेचे अध्यक्ष गोविंद गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. काटे म्हणाले, "काम कोणतेही असो, त्याचे श्रेष्ठत्व कामावर नव्हे तर माणुसकीवर अवलंबून असते. समाजसेवेचा वसा निःस्वार्थपणे जपला गेला पाहिजे." सामाजिक भावनेतून नागरिकांनी आपल्या विशेष दिनी अशा उपक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. 'आमच्या श्वासात माणूसपण' हे ब्रीद जपत डॉ. काटे यांनी अर्थविषयक संशोधन, लेखन आणि समाजकार्यात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या 'अर्थदिशा', 'अर्थजागर', 'अर्थसंपदा' आणि 'अर्थनीती' या पुस्तकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला आहे. स्मशानभूमीत दुःखाच्या क्षणी कुटुंबीयांना आधार देणारे स्मशान जोगी समाजात अनेकदा दुर्लक्षित राहतात. त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा या उद्देशाने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेमप्रकाश बांगर यांनी केले.

आदित्य जनसेवा सप्ताहात मूकबधिर व अनाथ मुलांना हॉटेलमध्ये भोजन

युवासेनेचा सामाजिक उपक्रम; मुलांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शिवसेना नेते व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'आदित्य जनसेवा सप्ताह' अंतर्गत युवासेना छत्रपती संभाजीनगरच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या मालिकेत मूकबधिर व अनाथ मुलांसाठी विशेष भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शहर युवा अधिकारी स्वप्निल डिडोरे यांच्या पुढाकारातून शनिवारी हॉटेल अजिंक्य पॅलेस येथे मूकबधिर व अनाथ मुलांना मोफत भोजन देण्यात आले. शाळा सुरू झाल्यानंतरही अनेक अनाथ मुलांना वसतिगृह अथवा अनाथाश्रमाच्या मर्यादित वातावरणात राहावे लागते. त्यांना बाहेर फिरण्याची व हॉटेलमध्ये जाऊन भोजन करण्याची संधी क्वचितच मिळते. ही बाब लक्षात घेऊन युवासेनेने हा उपक्रम राबविला.

या कार्यक्रमामुळे मुलांना आनंददायी अनुभव मिळाला असून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. उपस्थितांनीही या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, जिल्हा युवा अधिकारी तथा नगरसेवक हनुमान शिंदे, युवती सेना पदाधिकारी सानिका देवराज, शहर युवा अधिकारी अजय चोपडे, रामेश्वर कोरडे यांच्यासह युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वादळी पावसाचा फटका; झाडाची फांदी पडून सौर पंपाची यंत्रणा निकामी

शेतकऱ्याचे मोठे नुकसान; मदतीची अपेक्षा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वैजापूर तालुक्यातील भगूर परिसरात अलीकडे झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे एका शेतकऱ्याच्या सौर पंपाचे मोठे नुकसान झाले आहे. झाडाची मोठी फांदी सोलर पॅनेलवर कोसळल्याने संपूर्ण सौर पंप यंत्रणा बंद पडली असून सिंचन व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. भगूर येथील शेतकरी शशांक तुळशीराम चव्हाण यांच्या गट क्रमांक ७८/२ मधील शेतात सौरऊर्जेवर चालणाऱ्या पंपाद्वारे पिकांना पाणीपुरवठा केला जात होता. काही दिवसांपूर्वी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतातील झाडाची मोठी फांदी थेट सोलर पॅनेलवर पडली. या दुर्घटनेत पॅनेलचे मोठे नुकसान होऊन संपूर्ण यंत्रणा निकामी झाली आहे.

सौर पंप बंद पडल्यामुळे शेतातील उभ्या पिकांच्या सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला असून पिकांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

सोलर पंपाच्या दुरुस्तीसाठी मोठा खर्च अपेक्षित असल्याने संबंधित शेतकऱ्यासमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. या नुकसानीचा महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामा करून शासनाच्या आपत्ती निवारण निधी अथवा उपलब्ध योजनांमधून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी शशांक चव्हाण यांनी केली आहे. परिसरातील शेतकऱ्यांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला असून प्रशासनाने त्वरित दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

झाल्टा फाटा येथे अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

12.28 लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त; गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : अन्न व औषध प्रशासनाने चिकलठाणा परिसरातील झाल्टा फाटा येथे मोठी कारवाई करत सुमारे १२ लाख २७ हजार ९६४ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. राज्यभरात अवैध अन्नपदार्थ व भेसळीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर येथील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना गुप्त माहितीदारामार्फत एमएच-२० जीझेड-२२४७ क्रमांकाच्या वाहनातून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे अधिकाऱ्यांनी झाल्टा फाटा येथे सापळा रचून संबंधित वाहनाची तपासणी केली. तपासणीत वाहनामध्ये विविध प्रकारचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला. या कारवाईत एकूण १२,२७,९६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी राजेंद्र बाविस्कर यांच्यासह संबंधित आरोपींविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच अन्य लागू कायद्यांनुसार चिकलठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त करकळे यांनी दिली.

अवैध व प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्री व वाहतुकीविरोधातील कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

जिल्हा परिषद सदस्यांच्या जात प्रमाणपत्राची चौकशी करण्याची मागणी

जनता दल सेक्युलर ची मागणी

परभणी : पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आरक्षित जागांवर निवडून आलेल्या उमेदवाराचा जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्राची सखोल चौकशी करून खोटी कागदपत्रे आढळल्यास त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे अशी मागणी जनता दल सेक्युलर चे कुंदन गोकुळ ठाकूर यांनी केली आहे या संदर्भात जिल्हाधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती तसेच राज्य निवडणूक आयोग यांना निवेदन देण्यात आले आहे निवेदनात काही उमेदवारांची चुकीची माहिती देऊन खोटे जात प्रमाणपत्र सादर करून निवडणूक लढवण्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे संबंधित उमेदवाराच्या जात प्रमाणपत्रे वंशावळ शैक्षणिक नोंदी तसेच जात वैधता प्रमाणपत्राची स्वातंत्र्य व सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे चौकशीत बनावट अथवा खोटी कागदपत्रे वापरल्याचा निष्पन्न झाल्यास संबंधित सदस्याचे सदस्यत्व तात्काळ रद्द करून त्याच्याविरोधात कायदेशीर प्रशासकीय कारवाई करावी तसेच या प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सार्वजनिक करावा अशी मागणी कुंदन ठाकूर यांनी केली आहे

मोदी सरकारच्या 12 वर्षांच्या विकासकामांवर उद्योजकांशी डॉ. संजय जैस्वाल यांचा संवाद

उद्योगवाढ, जनकल्याणकारी योजना आणि देशाच्या विकासाचा घेतला आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : केंद्रातील मोदी सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा बिहारमधील पश्चिम चंपारण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. संजय जैस्वाल यांनी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यादरम्यान शहरातील उद्योजकांशी संवाद साधला.

प्रसिद्ध उद्योजक राम भोगले यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष संवाद कार्यक्रमात मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांतील विकासाभिमुख, जनकल्याणकारी आणि उद्योगपूरक धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

डॉ. जैस्वाल यांनी केंद्र सरकारने देशाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या विविध योजनांची माहिती देत गरीब, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उन्नतीसाठी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. तसेच उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांबाबतही त्यांनी उद्योजकांशी संवाद साधला.

यावेळी माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, उद्योजक विवेक देशपांडे, उपमहापौर बापू घडामोडे, रवी वैद्य यांच्यासह शहरातील अनेक उद्योजक व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

संवादात्मक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात उपस्थित उद्योजकांनी विविध विषयांवर आपली मते व्यक्त केली. केंद्र सरकारच्या विकासात्मक उपक्रमांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याने कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

हळदीचे बियाणे चोरी प्रकरणी तिघांना अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

पाच लाख साठ हजाराचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

परभणी : पूर्णा पोलीस स्टेशन मध्ये सहा जून रोजी दाखल झालेल्या हळद बियाण्याच्या चोरीचा प्रकरणाचा तपास लावत स्थानी गुन्हे शाखेने तीन आरोपींना अटक केली आहे या कारवाईत पाच लाख साठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आणि दोन आरोपीचा शोध सुरू आहे स्थानी कुणी शाखेचे साहेब पोलीस निरीक्षक जायभाय यांच्या मार्गदर्शनाखाली चोरी व घरपोडीचे निवड करण्यासाठी पथक ताडकळस व पूर्ण परिसरात माहिती संकलन करत होते त्याचवेळी गुप्त बातमी दारा मार्फत पूर्ण पोलिस ठाण्यात दाखल झाले असलेल्या हळद बियाणे चोरी प्रकरणातील आरोपी बाबत खात्रीशीर माहिती मिळाली मिळालेल्या माहितीनुसार अल्पेश अमृतराव देशमुख राहणार परभणी हा रोपे पिंपरी देशमुख येथे असल्याचे समजताच पथकाने सापळा असून त्याला ताब्यात घेतले व चौकशी दरम्यान त्याने जगन्नाथ माधवराव मोहिते राहणार महागाव तालुका पूर्णा अभिषेक मुंजाजी नाईकवाडे करण भगवान चिमटे सचिन उर्फ भौऱ्या सुरेश डुकरे सर्व राहणार देशमुख पिंपरी यांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली.

जागतिक संगीत दिनानिमित्त संभाजीनगरकरांना सुरेल मेजवानी; 100 कलाकारांचा विनामोबदला अविस्मरणीय कलाविष्कार; रंगमंदिरात रसिकांची तुडुंब गर्दी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जागतिक संगीत दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगरातील विविध क्षेत्रांतील सुमारे १०० कलाकारांनी एकत्र येत संगीत, नृत्य आणि लोककलांचा बहारदार संगम सादर केला. महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रंगमंदिरात तुडुंब गर्दी केली होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये, महापालिका आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त अंकुश पांढरे, विश्वनाथ ओक, लक्ष्मीकांत काळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

विशेष म्हणजे, शहरातील कलाकारांनी अवघ्या सहा दिवसांत या भव्य कार्यक्रमाची तयारी पूर्ण केली. कोणताही मोबदला न घेता सर्व कलाकारांनी सहभाग नोंदवून सांस्कृतिक एकात्मतेचे दर्शन घडविले.

नांदीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर नाट्यगीत, बंदिश, तराना यांसारख्या शास्त्रीय सादरीकरणांनी वातावरण सुरेल केले. पुढे अभंग, लोकसंगीत, वासुदेव, भारूड, गोंधळ आणि लावणी अशा विविध लोककलांच्या सादरीकरणाने कार्यक्रम रंगत गेला. मराठी व हिंदी गीतांसोबत गझल आणि पाश्चात्त्य रॉक बँडच्या सादरीकरणानेही रसिकांची दाद मिळवली.

स्वरानुभूती आणि तालवाद्य कचेरीने वादकांच्या कौशल्याची झलक दाखवून दिली. स्थानिक कलाकार इतक्या उच्च दर्जाचा आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रम सादर करू शकतात, याची प्रचिती शहरवासीयांना या निमित्ताने आली.

या उपक्रमामागील संकल्पनेला महापौर समीर राजूरकर तसेच महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांचे प्रोत्साहन लाभले. महाराष्ट्रात एखाद्या शहरातील तब्बल १०० कलाकारांनी एकत्र येऊन विनामोबदला कार्यक्रम सादर केल्याची ही दुर्मीळ घटना ठरली.

शहरातील विविध सांस्कृतिक संस्थांमध्ये कार्यरत असलेले कलाकार जागतिक संगीत दिनाच्या निमित्ताने प्रथमच एका व्यासपीठावर एकत्र आले. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरच्या समृद्ध संगीत परंपरेचे दर्शन घडविणारी ही आनंदयात्रा रसिकांसाठी अविस्मरणीय ठरली.

यापुढे दरवर्षी जागतिक संगीत दिनानिमित्त अशा स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित करण्याचा संकल्प कलाकारांनी व्यक्त केला. यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी या उपक्रमासाठी महानगरपालिका सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासन दिले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911